O.W.No - 6592/2017

# प्रेस नोट

दि.२१/०८/२०१७

सांगवी वाहतूक विभाग अंतर्गत रावेत-औंध बी.आर.टी. मार्गावरील जगताप डेअरी चौक ( साई चौक ) येथे पिंपरी चिंचवड म.न.पा. चे कार्यालयीन आदेश पिंपरी-चिंचवड न्यू टाऊन डेव्हलपमेंट ऑथॉरिटी जा. क्र. DA/ENG-B/ACCTT/WO/9 दि.०२/०१/२०१७ अन्वये दुहेरी उड्डाण पुलाचे बांधकाम करण्यास परवानगी देण्यात आली आहे. त्याप्रमाणे सध्या जगताप डेअरी चौकात (साई चौक ) सध्या उड्डाण पुलाचे काम चालू आहे.

जगताप डेअरी चौक (साई चौक) येथून पुणे ते मुंबई व नाशिक फाटा ते वाकड अशी मोठया प्रमाणात वाहतूक असते. सदरची वाहतूक सकाळ व सायंकाळी मोठया प्रमाणात असते. त्यामुळे वाहतूक संथगतिने चालत असते. सदर ठिकाणी उड्डाण पूलाचे काम चालू असल्याने अधिक भर म्हणून वाहतूकीस अडथळा निर्माण होत असतो. जगताप डेअरी चौकात उड्डाण पूलाचे काम चालू ठेवण्यासाठी व गर्दीच्या वेळी वाहतूक सुरळीत, सुरक्षित आणि विना अडथळा चालू ठेवण्यासाठी खालील प्रमाणे उड्डाण पूलाचे काम पुर्ण होईपर्यंत वाहतूकीत तात्पुरत्या स्वरूपात खालील प्रमाणे बदल दि. २१/०८/२०१७ रोजीपासून करण्यात येत आहेत.

१) वाकड वाय जंक्शन येथून जगताप डेअरी चौकाकडे (साई चौक) जाणा-या सर्व वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे. सदर वाहन चालकांनी सरळ कस्पटे चौकातुन जगताप डेअरी चौक येथून इच्छित स्थळी जावे.

२) शिवार चौकातून येणा-या वाहनांना जगताप डेअरी चौकातून उजवीकडे वळून काळेवाडी फाटयाकडे जाण्यास प्रवेश बंद करण्यात येत आहे. सदर वाहन चालकांनी सरळ जावून, सावित्रीबाई फुले उद्यान चौकातून यु-टर्न घेवून इच्छित स्थळी जावे.

३) काळेवाडी फाटा, रावेत कडून येणा-या वाहनांना जगताप डेअरी चौकातून सरळ औंध व पुणे कडे जाण्यास प्रवेश बंद करण्यात येत आहे. सदन वाहन चालकांनी जगताप डेअरी चौकातून उजवीकडे वळुन कस्पटे चौकातून इच्छित स्थळी जावे.

तरी पिंपरी चिंचवड शहर व पुणे शहर परिसरातील सर्व नागरीक व वाहन चालकांना आवाहन करण्यात येते की, जगताप डेअरी चौकातील दुहेरी उड्डण पूलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी व जगताप डेअरी चौकातील (साई चौक) वाहतूक सुरळीत, सुरक्षित व विना-अडथळा चालू ठेवण्यासाठी वरील प्रमाणे वाहतूकीत बदल केल्या प्रमाणे पर्यायी मार्गाचा वापर करावा व पुणे शहर वाहतूक पोलीसांना वाहतूक सुरळीत व सुरक्षित चालू ठेवण्यासाठी सहकार्य करावे.